दिपोत्सव २०२५

साप्ताहिक

# बेरार टाईम्स

वर्ष-१४ | गोंदिया | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | मंगळवार,दि.२१ ऑक्टोबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# दिवाळी बळीराजा-बळीप्रजेची, कास्तकार-कष्टकऱ्यांची

इडा पिडा जावो।
बळीचे राज्य येवो।।

बळीच्या काळी कोणी उच्च नव्हते. कुणी नीच नव्हते. तिथे ब्राह्मण नावाची जातच नव्हती.आधीचा बळीभारत हा आर्यरहित भारत होता. आर्यभट वखवखलेल्या भुकेल्या अवस्थेत तिथे आले. ते वखवखलेले होते. तसेच क्रूर नि आक्रमक होते. त्यांनी सिंधू भारतातील लोकांशी युद्धे केलीत. कपट केले.

सरळ वार करत नव्हते. म्हणून नाना सोंगे ढोंगे केलीत. आणि इथल्या बहुजनांचे सिंधुजनांचे मानवतावादी-समता-वादी आचार विचार नष्ट करून ती संस्कृती नष्ट केली. सारा विध्वंस माजवला. अराजक स्थिती निर्माण केली.

बहुजन संस्कृती-बहुजन बळीराष्ट्र नष्ट केले. ती व्यवस्था मोडतोड केली.आणि आपली कट्टर विषमतावादी संस्कृती लादली.

बळीचा पाडाव सिंधू संस्कृतीतील राजाचा पाडाव होता. त्या संस्कृतीचा विनाश होता. बळीच्या काळात या देशात खऱ्या अर्थाने सोन्याचा धूर निघत होता. खऱ्या अर्थाने समता समृद्धी होती.

आता आपण बळीची याद कशासाठी ठेवायची? त्याच्या राज्याची याद कशासाठी करायची. निव्वळ बळीची याद केल्याने बळीसंस्कृती-बळीराष्ट्र निर्माण होईल का? बिल्कुल नाही! त्यासाठी इथल्या तमाम बहुजनांना जागे व्हावे लागेल. आपले सिंधुराष्ट्र-बळीराष्ट्र पुन्हा उभे करावे लागेल. पराक्रमी व्हावे लागेल.

वामन नावाच्या कुलट्याने बळीचा खून केला त्याला पाताळात गाडले. बळी असूर होता. राक्षस होता म्हणून वामनाच्या रूपाने ब्राह्मण वामनाने त्याचा खून केला असा प्रचार वामन लोक आपल्या पोथ्या, पुराणातून सतत करतात. परंतु बळी हा ब्राह्मणांचा शत्रू होता. तो समतेचा रक्षक होता. तो बहुजनांचा रक्षक होता.

स्त्री-पुरुष समतेचा सखा होता. या देशातील ज्या ज्या लोकांना ब्राह्मण वाईट म्हणतात, राक्षस म्हणतात, ते सर्व बहुजनांचे रक्षक होते. सिंधू संस्कृतीचे रक्षक होते. म्हणून पोथ्या पुराणे वाचून, भटी कीर्तने ऐकून, प्रवचन ऐकून, बह्यकू नका. कारण या सर्व प्रकारांचे कर्तेधर्ते ब्राह्मण असतात. ते तुम्हाला तुमच्यातल्याच भल्यांना वाईट दुष्ट ठरवतच नाहीत तर तुमच्या मनात त्यांच्याविषयी द्वेष निर्माण करतात. वाईट भावना निर्माण करतात. आजकालचे वामन कास्तकारांना बळीराजा म्हणतात. कारण शेतकरी हे खऱ्या अर्थाने बळीराजाचे वंशज आहेत.




बळीप्रमाणे संपूर्ण कास्तकार कष्टकरी त्यांनी पाताळात म्हणजे जमिनीत गाडले आहेत. कष्ट करूनही त्याला गरिबीत, दुःखात लोटले आहेत. आणि जे जे वामन वंशज आहे, ते मात्र ऐष आरामात आहेत. कष्ट न करताही श्रीमंत आहेत. बळीच्या राज्यात सिंधूकाळात या उलट स्थिती होती. कष्टकरी कास्तकार उत्पादक यांचा वरचष्मा होता. ते दर्जाने उत्तम होते. ते आयतोबा नव्हते. त्यांना प्रतिष्ठा होती. मान होता. बळी संस्कृती अशी आजच्यापेक्षा उलटी होती. तिला पुन्हा प्रतिष्ठित करायला पाहिजे. पुन्हा कष्टकऱ्यांना सुखी जीवन मान मरातब मिळायला पाहिजे.आरामात कष्ट न करता जगणाऱ्यांचे स्थान खाली व्हायला पाहिजे. त्यांची सामाजिक पत कमी करायला पाहिजे.

हे तेव्हाच होईल जेव्हा इथला बळीराजा-बळीप्रजा उठाव करेल. आपली संस्कृती पुन्हा उभारेल. ब्राह्मणीमूल्य ब्राह्मणीसंस्कृती फेकून देईल. आज वर्चस्व, दहशतवाद आणि विषमतावादी बिनकष्टी ब्राह्मण जातीची आहे. कारण त्यांनी आपली मती मारून टाकली आहे. सर्व शिक्षण त्यांनी आपल्या हातात घेतले आहे. समाज, अर्थ, शिक्षण नीती आचार-विचार हे आता आम्ही उभारले पाहिजे. प्रतिष्ठित त्यांना करूया जे धनधान्य निर्माते आहेत. या भूमीचे मूळ मालक आहेत. सर्व बहुजन बाया-माणसे. आजही आम्ही ब्राह्मणी संस्कृतीत जगतो आहोत. त्यांच्या भाषेला, त्यांच्या संस्कृतीला त्यांनी लादलेल्या देवदेवतांना, मग त्या कितीही विकृतीपूर्ण असोत, अनेक हात तोंड असलेल्या देव्या असोत, त्यांचे पुजारी झालो आहोत. हे सर्व टाकायला पाहिजे.

बळी राज्याची संस्कृती वैज्ञानिक संस्कृती होती. ती पुन्हा उभारली पाहिजे. केवळ इच्छा केल्याने, आस धरल्याने, वा इडा पिडा टळो म्हटल्याने विषमतेची पीडा टळणार नाही. त्यासाठी या देशातील बळी वंशियांनी, नाग, द्रविड वंशियांनी बळी संस्कृतीसाठी कसून प्रयत्न केले पाहिजे. वैयक्तिक भल्याचा विचार फेकून व्यापक समाजाचा विचार केला पाहिजे. त्यासाठी सर्व साधनांनी प्रचार केला पाहिजे. वामनी विषमतेवर विजय मिळवला पाहिजे. हा विजय ज्या दिवशी उगवेल, तेव्हाच बळीचे राज्य आले असे म्हणता येईल. सर्व बहुजनांनी यासाठी सिद्ध व्हावे. तेव्हा सर्वांना, बायामाणसांना प्रोत्साहित करा, सामील करा, स्वतःचे हे ध्येय स्वीकारा, इतरांत पेरा, बळीराज्य नक्कीच येईल.

**- नागेश चौधरी, नागपूर**

साप्ताहिक
बेरार टाईम्स
बातम्यांसाठी सोशल मिडीयाच्या सर्व प्लेटफॉर्मवर उपलब्ध आहोत एकदा नक्की भेट देवून ताज्या घडामोडींचा लाभ घ्यावे.












## संपादकीय

# दीपपर्व ;आनंदाची पर्वणी

बळीराजाच्या या सर्व इतिहासाकडे पाहिलं असता त्याचा आज काय संदर्भ, आजच्या जीवनात त्याचं काय स्थान किंवा ज्याला आपण मॉडर्न रिलेव्हन्स किंवा प्रेझेंट रिलेव्हन्स ( modern relevance or resent relevance ) म्हणतो, असा यामध्ये काही आहे का? असा प्रश्न कोणाच्याही मनात निर्माण होईल. आपण केवळ भूतकाळातल्या काही गोष्टींचा गौरव करण्यासाठी हे सांगतोय, की आज त्यातलं काही उपयुक्त आहे? बळीराजाच्या एकूण राज्यपद्धतीमधून, त्याच्या व्यवहारामधून आज आपल्याला काही घेता येण्यासारखं आहे, हे पाहणं महत्त्वाचं आहे. त्या दृष्टीनं मला असं वाटतं, की बळीराजाचं हे जे सगळं सांस्कृतिक रूप आहे, ते आजच्या शेतकऱ्यांनाही मार्गदर्शक आहे आणि एकूण समाजव्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या स्थानी समाजाला दिशा देण्याचे काम करणारं जे आहेत त्यांनाही ते मार्गदर्शक आहे. भारतासह विदेशा–तही दिवाळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वजण आपापल्या परीने दिवाळी पर्वाचा आनंद लुटतात. हिंदुसंस्कृतीतील सर्वांत मोठा सण म्हणूनही दीपोत्सवाला महत्त्व आहे. प्रत्येकाच्या अंगणात तिमिराला घालवून प्रकाशकिरणे पसरविणारा हा सण. अंधाराकडून उजेडाकडे नेणारी ही दिवाळी प्रत्येकाच्या मनात घरात मांगल्य घडविणारी असते.

अशा या दिवाळीनिमित्त सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

देशभर दिवाळी साजरी करण्याच्या वेगवेगळ्या प्रथा–तऱ्हा आहेत. धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी नरकचतुर्थीच्या दिवशी आपल्यातील नरकरुपी पाप, अहंकाराचे उच्चाटन केले जाते. लक्ष्मीपुजनासोबतच ग्रामीण भागातील महत्त्वाचा दिवस म्हणजे बलीप्रतिपदेचा. शेतकरी आपल्या राजा बळीराजाची पूजा अर्चना मोठ्या भक्तिभावाने करतात. अशा या मांगल्याचे प्रतीक असलेल्या दिवाळीच्या निमित्ताने माणसातील प्रकाशतत्वाचे प्रफुल्ल प्रक्षेपण अनुभवता येते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने देखील या सणाचे माहात्म्य आहे.

दिव्यांचे वैविध्यपूर्ण आणि कलात्मक प्रकार आहेत. त्यांचे सांस्कृतिक स्थान मात्र अनन्यसाधारण आहे. ज्योती अनेक पण प्रकाशतत्व एकच. शरीर म्हणजे पणती व त्यातील ज्योत म्हणजे प्राण, असे थोर संत सांगून गेले.

संतांच्या दृष्टिकोनातून स्वतःला अंतर्मुख करून टाकणारे हे प्रकाशपर्व आहे. हे प्रकाशपर्व शेतकरी, कष्टकरी, गरीब, श्रीमंत सर्वांच्या अंगणात आले आहे. प्रत्येक जण आपल्या लायकीप्रमाणे हा सण साजरा करीत असतो. पण या सणात दरवळणारा सुगंधतत्व मात्र एकच आहे.

पूर्व विदर्भातील जिल्हे धानपिकाचे.

सध्या कापणीचा हंगाम सुरू असला निसर्गाने मात्र आपला कोप दाखविण्यास सुरवात करीत आहे. यामुळे या दिवाळीला हातात आलेले पीक मात्र अडचणीत सापडण्याची भिती निर्माण झाली आहे. तरी निसर्गापुढे काही चालत नाही. या नियतीला सामोरे जाऊन आपल्या परीने तो प्रकाशपर्व साजरा करण्यासाठी अंधारातून दिव्यांच्या उजेडात प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी प्रत्येक जण मात्र सज्ज झाला आहे. दीन दुबळ्यांसह सर्वांची दिवाळी दीपोत्सवाच्या उजेडाने न्हाऊन निघावी हीच अपेक्षा.

१४ वर्षापासून जनतेच्या वाचकांच्या सेवेत पुर्व विदर्भात जिल्ह्यात हिंदी भाषिकांची मोठी संख्या असतांनाही मराठीची अस्मिता टिकवून ठेवत निर्भिड, जनसामान्यांचे व्यासपीठ म्हणून बेरार टाईम्सने आपली जागा कायम केली आहे.

वाचक, जाहिरादार व वितरक तसेच हितचिंतकांच्या प्रेमापोटी दिपोत्सव विषेशांक २०२५ साकारु शकलो आहे. या दिपोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यातील बेरार टाईम्सचे हिंतचिंतक, वाचक जाहिरातदार, प्रतिनिधी वितरक व जनतेला दिवाळीच्या

हार्दिक शुभेच्छा.

बळीराजा बळ दे..
गौतम बुद्धा, बुद्धी दे..
जिजाऊ माते प्रेरणा दे..
शिवराया युक्ती दे..
तुकोबाराया ज्ञान दे..
शंभूराजा शक्ती दे..
उमाजीराजा शौर्य दे..
ज्योतिबा त्यागाची भावना दे..
सावित्रीमाई संयम दे..
भीमराया शिक्षणाची आस दे..
शाहूराजा तळमळ दे..
अण्णा भाऊ लेखणी दे..
अहिल्यामाई जनसेवेची इच्छा दे..इडा–पीडा टळू दे, बळीचे राज्य येवू दे..


खेमेंद्र कटरे–
मुख्य संपादक

# इडा पिडा टळों बळीचे राज्य येवों

शेतकरी विरोधी नेत्यांना फटाके लावून बळीराजा महोत्सव साजरा करुया! समतावादी बळीराजा, कपटी वामणाचा पराभव एक दिवस नक्की करेल हा आत्मविश्वास बळीराजा महोत्सव पर्वावर बळीच्या वारसांमध्ये वाढत जावोत, आणि समतेचे बळीराज्य येवो! या समस्त शेतकरी कष्टकरी बहुजन भावंडांना हार्दीक सदीच्छा!

शेतकऱ्यांना दुर्लक्षित करणाऱ्या, अपमानीत करणाऱ्या व्यवस्थेला उलथून टाकण्याचे बळ, समस्त बळी वंशातील भूमिपुत्रांमध्ये येण्याच्या दृष्टीने बळी महोत्सव, दिपावली साजरी झाली पाहिजे. त्यासाठी फटाके फोडून बळीराजा महोत्सवाचा बेगडी आनंद घेण्याच्या ऐवजी, शेतकरी विरोधी, ओबीसी विरोधी, कष्टकरी, कामगार विरोधी, ओबीसींच्या जातीनिहाय जनगणना विरोधी नेत्यांना फटाके लाऊन बळीराजा महोत्सव साजरा करुया!

महात्मा जोतीराव फुले यांनी मशेतकऱ्यांचा असूडफ मध्ये विविध अंगांनी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणाची चर्चा केली. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध बाजुने होणारे शोषण समजून घेतले नाही तर, शेतकरी बहुजनांच्या शोषणाविरुद्धचा लढा निर्णायक स्थितीत येत नाही हा आजपर्यंतचा अनुभव आहे. शेतमालाचे भाव वाढीसाठी शेतकऱ्यांना वारंवार आंदोलन करण्यास भाग पाडणे देखील अनैतिक आहे, अन्यायकारक आहे. आज १०००० रुपये क्विंटल कापसाचा भाव परवडेल, परंतु दोन वर्षांनी तो न परवडणारा भाव ठरेल. त्यावेळी पुन्हा शेतकऱ्यांनी आंदोलन करावे का? शेतकऱ्यांना एवढा वेळ असतो का? यासाठी उत्पादन खर्चावर आधारित भाव, महागाई निर्देशांकानुसार भाव किवा इतर आणखी बाबींचा आधार घेऊन स्थायी स्वरुपाचा उपाय केला पाहिजे. त्यासाठी शेतकरी ओबीसी पोरांचा समावेश असलेला कृषी आयोग असला पाहिजे. शासन, प्रशासनात जातिव्यवस्थेत शुद्र ठरविलेल्या शेतकरी पोरांचा संख्या प्रमाणात भरणा असणे म्हणूनच अत्यंत गरजेचे आहे. केवळ आर्थिक मागण्यांचे आंदोलन हे शेतकरी न्यायाचे आंदोलन होत नाही, हे शरद जोशीच्या शेतकरी आंदोलनात आपल्या लक्षात आले. शरद जोशीनी महात्मा फुलेंच्या मशेतकऱ्याचा असूडफ या



ग्रंथाची आठवण करून ओबीसींना सोबत घेतले, परंतु त्याच ग्रंथातील प्रशासनात सर्व जातींची त्यांच्या संख्याप्रमाणात नेमणूक करण्याची गरज असल्याचे म. फुले यांचे मत लोकांच्या नजरेस आणले नाही.

शेतकरी हिताचे निर्णय होण्यासाठी ओबीसींच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दा म.फुले अधोरेखित करतात आणि याउलट ओबीसींच्या प्रशासनात प्रनिधित्वाची तरतुद असलेल्या मंडल आयोगाला शरद जोशी उष्ट्या पत्रावळी म्हणतात. इथेच शेतकरी ओबीसी जातींचा घात केला जातो. म्हणून खऱ्या अर्थाने शेतकरी कष्टकरी हितासाठी लढायचे असेल तर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख, सत्यशोधक प्रबोधनकार ठाकरे, सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे, सत्यशोधक केशवराव जेधे, सत्यशोधक दिनकरराव जवळकर, सत्यशोधक भास्करराव जाधव, सत्यशोधक व्यंकटराव गोडे, सत्यशोधक आनंदस्वामी इत्यादी असंख्य सत्यशोधक पुढाऱ्यांनी घेतलेल्या भूमिका मध्यवती ठेवून वाटचाल करावी लागेल. जातीव्यवस्था, धर्म व्यवस्था ह्या शेतकरी ओबीसी, बहुजन समाजाच्या शोषणाच्या मुख्य व्यवस्था असल्यानेच द्रष्टे महात्मा फुले यांनी ब्राम्हणी आडपडद्यात गुलामगिरी या ग्रंथात धर्माधारीत शोषणाची चिकित्सा केली. स्त्री–शुद्रातिशुद्र कष्टकरी शेतकरी कामगार यांच्या शो–षणाची व्यवस्था असलेला वैदिक धर्म , मनुस्मृतीचा धर्म याचा धिक्कार महात्मा फुले करतात. अंधभक्तांच्या फितुरीमुळे ओबीसी, दलित, आदिवासींचे सामाजिक, आर्थिक न्यायाचे लढे एकत्रीतपणे पुढे जाण्यात अडथळे निर्माण झालेले आहे. याही लोकांना फटाके लावण्याचे काम बळीराजा महोत्सव पर्वावर आपल्याला करावे लागेल.

उठ ओबीसी जागा होती! संघर्षाचा धागा होता!

**बाबा बीडकर**

# महासम्राट बळीराजा रथयात्रेचे गोंदिया जिल्ह्यात उत्साहात स्वागत



**गोंदियाः–** विदर्भ स्तरीय महासम्राट बळीराजा सन्मान रथयात्रा अत्यंत भक्तीभावाने श्रद्धा, संस्कृती, सामाजिक ऐक्य, व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश घेऊन दुसऱ्या टप्प्यात दिनांक १८ ते २० ऑक्टोबर २०२५ रोजी पूर्व विदर्भातील शिवतीर्थ उमरी ता सावनेर येथून नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या पाच जिल्ह्यांमधून मार्गक्रमण करून तेलकामठी तालुका कळमेश्वर येथे समारोप करण्यात आला. रथयात्रेचे प्रत्येक ठिकाणी विविध समाजातील लोकांकडून तसेच विविध संघटनांकडून हर्षोल्लासात स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी दिंडी, भजन, पालखी द्वारे सहभाग नोंदवला. महाराष्ट्रात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले.

महासम्राट बळीराजा राष्ट्र सेवा संघ द्वारा महासम्राट बळीर–ाजा रथयात्रेचे शुभारंभ तीर्थक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना पुण्यतिथी दिनानिमित्त अभिवादन करून राष्ट्रीय प्रबोधनकार सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज व इतर प्रबोधनकार यांच्या हस्ते झाले होते. पहिला टप्प्यात दि. ११ ते १४ ऑक्टोबर पर्यंत अमरावती, यवतमा?ळ, वर्धा, नागपूर या चार जिल्ह्यातून आयोजन केले होते, त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

सिंधू (शिव)संस्कृतीचा महानायक, रक्षक स्वामी तिन्ही जगाचा, कृषी, व्यापार, तंत्रज्ञान, विज्ञान,कला, संस्कृती, समृद्ध करणारा, प्रजाहितदक्ष, समतावादी, तत्वज्ञानी, न्यायी,महादानशूर, संविभागी,अलिखित संविधान देणारा पहिला महासम्राट आहे. ज्याचे संपूर्ण आशिया खंडावर साम्राज्य होते असा महासम्राट, ज्याची आजही ङ्गइडापिडा टळो, बळीचे राज्य येवोङ्ग म्हणून समस्त भारतीय विविध सणाद्वारे सुमारे तीन हजार वर्षापासून आठवण करतात. अशा महासम्राटाची दिवाळीमध्ये बलिप्रतिपदेच्या दिवशी सामूहिक पूजन, सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणूक काढून बलिप्रतिपदा दिन साजरा करावा व नवीन पिढीला बळीराजाच्या कार्याचा प्रचार प्रसार व्हावा व राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत व्हावी या हेतूने विविध संघटनांच्या सहकार्याने रथयात्रेचे आयोजन केले होते.

रथयात्रेमध्ये महासम्राट बळीराजाच्या मूर्तीचा रथ, जिजाऊ शिवबा मूर्तीचा रथ, झांकी, ढोल ताशा, पथनाट्य, गाण्यांचा कार्यक्रम हे यात्रेचे विशेष आकर्षण होते.

रथयात्रेसाठी सर्वश्री अभिविलास नखाते, ज्ञानेश्वर रक्षक, सेवकराम राऊत, रोशन उरकुडे, उमेश कोराम, विनोद मानकर, शुभम गजभिये, सुभाष खंगार, अंकुश वैद्य, बन्सीधर शहारे, सुधांशू मोह–ोड, योगराज धानोरकर, दिनेश इंगोले, नरेंद्र गद्रे, सुनिता नखाते, राजेश धोटे, प्रमोद वैद्य, भगवान चांदेकर, बबलू मेश्राम, सुजित मेश्राम, राजू पाटील, सचिन पराये, जितेंद्र पर्वते, प्रशांत येनगंदेवार, गिरीधर बोबडे, अभय महोतकर, सागर घुगसे, चंद्रशेखर ढोबळे, पंकज घाठोडे, संजय टेंभेकर, गिरीश आंदे, कांचन ढवंगडे, संजय ठाकरे अभिलाष खंडारे, वीरेंद्र कडू, दिनेश ठाकरे, गजानन इंगळे, सुनील पाथ–ोडे, गोविंदराव भंडारकर, मोंटू पिलारे, बाळकृष्ण राऊत, संजय कुथे,प्रदीप उरकुडे, सुखदेव गोटे, जयंत झोडे, उद्धव मेहंदळे, सुरेश तरोणे, बाळकृष्ण परशुरामकर, जगदीश वाडीभस्मे, खेमेंद्र कटरे, संजय कानतोडे, श्रद्धा पुंडकर, सुप्रिया बल्की, वंदना बनकर, प्रभाकर किल्लारे, सुधाकर भर्रे, यशवंत कुथे, शांताराम जडते, सुनंदा दिवटे, संगीता टक्कामोरे इत्यादी विदर्भातील मान्यवरांनी रथयात्रेत सहभाग व सहकार्य



केले.

१८ ऑक्टोंबरपासून निघ–ालेली महासम्राट बळीराजा रथयात्रा आज रविवारला(दि.१९) गोंदियात पोचली,या यात्रेचे उत्साहात स्वागत फुलचूर नाका ,जयस्तंभ चौक व अवंती चौकात करण्यात आले. नवेगावबांध येथून निघालेली ही यात्रा कोकणा,खरबी,कोहम ारा,सडक अर्जुनी,डव्वा,मुंडीपार गोरेगाव,गोंदिया येथे पोच–ली. या यात्रेचे गोंदियाच्या फुलचूर नाका येथे ओबीसी अधिकार मंच,ओबीसी संघर्ष समिती,ओबीसी बहुजन सकल समाजाच्यावतीने यात्रेचे प्रमुख डॉ.अभिविलास नखाते, रोशन उरकुडे,बंशीधर शहारे, स्व–ागत करण्यात आले.जयस्तंभ चौक,अवंती चौकात समाजप्रबोधनपर सादरीकरण रथयात्रेच्या आयोजकांनी केले.यावेळी प्रा.डी.एस.मेश्राम,खेमेंद्र कटरे,अमर वराडे,कैलास भेलावे,राजकुमार रामटेके,सविताताई बेदरकर,प्रेम साठवणे,शिशिर कटरे,संजीव रहांगडाले,राजकुमार पटले,जिवनलाल शरणागत,महेंद्र सोनवणे,यशोदा सोनवणे,धनेंद्र भुरले,देवचंद खोब्रागडे,आर.टी.घरडे,व्यंकटेश चनाप,रविंद्र बडगे,मिलिंद टेंभुर्णीकर,प्रफुल डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.


सभी नागरिकों, ग्राहकों को दीपावली की हार्दिक शुभकामनाएँ

**श्री हलवाई होटल असोसिएशन**

श्री टॉकीज रोड, गोंदिया-४४१६०१
फोन नं.(०७१८२) २३७५५६,
लॉज फोन नं. (०७१८२) २३७०७६

सर्व सुविधायुक्त आरामदायक व सबसे किफायती ए.सी.कमरे, एवं ए.सी. डोरमेट्री रुम ४००/- अत्यंत उचित किराये पर उपलब्ध.

अशोककुमार चौधरी – अध्यक्ष | महेंद्रभाई हालानी – कोषाध्यक्ष | नरेशकुमार अग्रवाल – सचिव
एवं समस्त सदस्यगण.



शुभ दिपावली एवम् नूतनवर्षाभिनंदन

**राईस मिलर्स असोसिएशन गोंदिया**

अशोक सी.अग्रवाल – अध्यक्ष | महेश अग्रवाल(माया) – सचिव | कैलाश अग्रवाल (ककोडी) – कोषाध्यक्ष
रविबाबू अग्रवाल – उपाध्यक्ष | अशोक बंसल – उपाध्यक्ष | सर्वेश भुतडा – उपाध्यक्ष (अर्जुनी/मोर.)
दिलीप कारडा – सहसचिव | प्रकाश अग्रवाल (गिन्नी) – सहसचिव | राहुल एम.अग्रवाल – सहसचिव

कार्यकारिणी सदस्य

कृष्णकुमारजी अग्रवाल, प्रकाशजी जायसवाल, सलीमभाई सौलंकी, नरेशजी बगडिया (देवरी),विजय बालारामजी अग्रवाल (आमगांव),दिलीपजी लधानी, आनंद रामेश्वरालालजी अग्रवाल (कोहमारा),अनिलजी शिवदयालजी असाटी(तिरोडा),रितेशजी अग्रवाल(बंटी, आमगांव),पंकजजी अग्रवाल (अन्नपूर्णा),रामअवतारजी अग्रवाल, सचिनजी गहाणे (सौंदड),प्रल्हादजी असाटी (आमगांव), मुकेशजी अग्रवाल (श्री.कृष्णा राईस मिल, आमगांव), अमरजी चिमनानी, आलोकजी असाटी, राजीवजी जयपुरिया, हितेशजी बग्गा, मनिषजी अग्रवाल, कमलजी जायसवाल (नवेगावबांध), विजय सावलरामजी अग्रवाल (आमगांव), निरज बदलेवप्रसाद अग्रवाल, पदमजी अग्रवाल, नितीश गजाननजी अग्रवाल, अविनाशजी गुरनानी, दिनेशजी अग्रवाल (गीता), सागरजी जयसवाल, राजेश बाबुलालजी अग्रवाल, संजयजी अग्रवाल (श्यामधनी), रामप्रकाश राधेश्यामजी अग्रवाल

मार्गदर्शक

दामोदरजी अग्रवाल, गजाननजी अग्रवाल, नंदकिशोर असाटी (आमगांव),हुकुमचंदजी अग्रवाल(शुभलक्ष्मी), गोकुलजी फाफट(आमगांव),दिनेशजी दादरिवाल, दिलीपजी असाटी(तिरोडा), शिवशंकरजी खंडेलवाल, हुकुमचंदजी अग्रवाल (मामा), किशनलालजी खंडेलवाल, दिपक मनोहरलाल अग्रवाल (आमगांव),

एवं समस्त सदस्यगण, राईस मिलर्स असोसिएशन, गोंदिया


स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत)


सर्व जनतेला दिवाळी, भाऊबीज व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
-: शुभेच्छुक :-
**दुय्यम निबंधक कार्यालय, गोंदिया**




सर्व जनतेला दिवाळी, भाऊबीज व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
-: शुभेच्छुक :-
**जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालय, गोंदिया**



सर्व जनतेला दिवाळी, भाऊबीज व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
-: शुभेच्छुक :-
**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय क्रिडा संकूल मरारटोली गोंदिया**









ऊन सावल्या येतील जातील
कोंब जपावे आतील हिरवे
चला दिवाळी आली आहे
ओंजळीत घ्या चार दिवें
पहिला लावा थेट मनातच
तरीच राहील दूसरा तेवत
घरात आणि प्रियजनांच्या
आयुष्यावर प्रकाश बरसतें
तिसरा असू दे इथे अंगणी
उजेड आल्या गेल्यानाही
चौथा ठेवा अशा ठिकाणी
जिथे दिवाळी माहित नाहीं
।। शुभ दीपावली।।















समृद्धीसाठी सहकार

**दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**

जिल्ह्यात ३१ शाखांमधून अविरत सेवा तत्पर सेवेचा वारसा लाभलेली गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांची, ठेवीदारांची व सभासदांची बँक

## दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., गोंदिया

मुख्य कार्यालय गायत्री मंदिर तिरोडा रोड, गोंदिया दुरध्वनी ८७६७८०१९१४ फॅक्स क्र.(०७१८२) २५२३८६

♦ठेवीदारांच्या ठेवीवर आकर्षक व्याजदर ♦बँकेतील ठेवींनादारांना विमा संरक्षण, ♦मुदती ठेवीवर कर्जाची सोय उपलब्ध. ♦शेतकऱ्यांना शेती विषयक गरजानुसार सर्व प्रकारचा कर्ज पुरवठा ♦बचत गटांना कर्ज पुरवठा ♦गृहकर्ज पुरवठा ♦वाहन कर्ज योजना ♦व्यवसायाकरिता मुक्त प्रत्यय कर्ज मर्यादा योजना ♦मालमत्ता गहाण योजना ♦वैयक्तिक कर्ज रुपये १५ लक्ष पर्यंत ♦पगारदार कर्मचाऱ्यांना मुक्त प्रत्याय कर्ज मर्यादा.

उपलब्ध सुविधा:-1) Rupay Debit ATM Card द्वारे कुठूनही पैसे काढण्याची सोय 2)RTGS/NEFT सुविधा 3) SMS Alert 4) Any Branch Banking 5) ABPS/NACH द्वारे Direct Benifit सुविधा 6) 19 शाखामध्ये ATM सुविधा. तसेच शाखेत मशीनद्वारे कॅश डिपॉजीट करण्याची सुविधा उपलब्ध.7) मोबाईल ATM VAN सुविधा उपलब्ध.

श्री राजेन्द्र जैन (अध्यक्ष) श्री. भेरसिंह नागपूरे (उपाध्यक्ष) श्री.अजय हलमारे (सचिव)

सर्वश्री. संचालकः- विजय भरतलालजी रहांगडाले (संचालक/आमदार), इंजि.राजकुमार सुदामजी बडोले (संचालक/आमदार), डॉ,अविनाश शिवकुमारजी जायस्वाल, केवलराम नत्थूजी पुस्तोडे, प्रफुल गोपालदासजी अग्रवाल, अशोक (गप्पू) लक्ष्मीनारायणजी गुप्ता, केतन शिवशंकरजी तुरकर, पंकज सुंदरलालजी यादव, विनोद भैय्याजी कन्नमवार, गंगाधर बाबुरावजी परशुरामकर, प्रमोद नामदेवरावजी संगीडवार, अरुण शिवकुमारजी दुबे, दुर्गाप्रसाद बाबुलालजी ठाकरे, विजयकुमार गंभीरसिंहजी राठोड, येजेंद्रलाल नामदेवरजी कटरे, सौ.प्रियाताई विनोदजी हरिणखेडे (संचालिका), सौ.रचनाताई चामेश्वरजी गहाणे (संचालिका)

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सुरेशचंद्र मधुकर टेटे आणि सर्व कर्मचारी वृंद.



स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर सप्तपदी स्वच्छतेची माझी वसुंधरा स्वच्छ सर्वेक्षण 2025

**कार्यालय नगर परिषद, आमगांव**

## माझी वसुंधरा अभियान 6.0

# फटाके बंदी

आमगांव शहरातील नागरीकांना सुचित करण्यात येते की, आमगांव कार्यक्षेत्रात हरीत सण व उत्सव साजरे करावेत व पर्यावरण पुरक पर्यावरणाचे संतुलन राखावे व फटाके मुक्त (प्रदुषण मुक्त) दिवाळी साजरी करावी...

**आमगांव शहराला हरित बनवूया...**

**दिवाळीच्या सर्व शहरवासीयांना हार्दिक शुभेच्छा....**

मुख्याधिकारी नगर परिषद, आमगांव — प्रशासक नगर परिषद, आमगांव












**थेट मनापासून..!**

दोस्तहो..!
यंदाची दिवाळी..
ज्यांच्या घरात अंधार असेल
त्यांच्या घरापर्यंत जावी
ज्यांच्या मनात अंधार असेल
त्यांच्या मनापर्यंत जावी
अंधारालाही
प्रकाशाची फुलं यावी !
तुम्ही
आम्ही
सारेच..
मनापासून
तसे प्रयत्न करूया..!
नुसत्याच
वरवर शुभेच्छा देण्याची
नाटकं
आता नकोत !

ज्ञानेश वाकुडकर












स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर सप्तपदी स्वच्छतेची स्वच्छ सर्वेक्षण 2025

# नगर पंचायत सालेकसा

## कडून समस्त नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

सालेकसा शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, सालेकसा कार्यक्षेत्रात हरील सण व उत्सव साजरे करावेत व पर्यावरण पुरक पर्यावरणाचे संतुलन राखावे व फटाके मुक्त (प्रदुषण मुक्त) दिवाळी साजरी करावी...

सालेकसा शहराला हरित बवनूया...

-: शुभेच्छुक :- **प्रमोद कांबळे** मुख्य अधिकारी तथा प्रशासक






उजाडली ऊषा
दाही दिशा,
उमलत्या स्वप्नांची,
मनात आशा,
धुंद ही निशा,
मनाची दशा,
हृदयाच्या आसपास,
प्रेमाची नशा,
प्रकाशाची आस,
दिव्याची वात,
ऊमलल्या कळीस,
सुगंधाची साथ.

**बेरार टाईम्सच्यावतीने सर्व वाचक, जाहिरातदारांना दिवाळी व भाऊबीजेच्या हार्दिक शुभेच्छा !**






### अन्.... मामा शब्दाला अर्थ आला

कंस शिकविला, शकुनी रंगविला....
पण, जो देह आला स्वराज्याच्या कामा....
कधीही कोणी नाही शिकविला मला
माझ्या श्री शंभू राजाचा हंबीर मामा....
स्वराज्याचे सरसेनापती जे
मोहिते घराण्याची शान....
छत्रपतींच्या सेवेसी तत्पर
आऊसाहेबांची घेऊनी आण....
मनी शिवचरणांचा ध्यास निशिदिनी
समशेर तुमची जणू सौदामिनी....
हर हर महादेव शब्द येता कानी
पराक्रमाने रोमांचित होई धरणी....
स्वभगिनी जी स्वराज्याची महाराणी
प्रसंगी केली तिची ही कान उघडणी....
शंभू ची ओळखूनी धाकला धनी
सावत्रपणाचा लेश ही न मनी....
पन्हाळगडीचा तो प्रसंग
स्मरता उठे अंगी रोमांच....
बंदी कराया राजाचा अंश
जना वाटे हंबीर झाला ची कंस....
क्षणात भासे भानू दक्षिणी उगवला
धेनू विसरूनी वात्सल्य,भक्षिली पिलाला....
विस्मरे सरिता सागर,मीळे पर्वताला
क्षणात शंभू,स्वराज्याचा अंत झाला....
पण....
हंबीर तो खंबीर झाला,स्मरूनी जिजाऊंना
राखीले इमान शिवचरणी, रक्षिले स्वराज्याला
मनोरथ धूर्तांचा उध्वस्त केला....
सावली धरुनी शंभुवर, आजन्म उभा राहिला
अन ममामाफ शब्दाला अर्थ आला....

**कविता केशवराव शिंदे (नाशिक)**
९९२२९९९६७७

























### "ती" अशक्त नाही

नकोरे समजू तिला अशक्त
तिच्या नसानसात आहे तुझेच रक्त
मुलगाच पाहिजे हा हट्ट तू का धराला
तुझा जन्म स्त्रीच्याच पोटी झाला हे कसा रे विसरला
बनेल तीही कोणाची बहिण, बायको आणि सासू
येऊ देऊ नकोरे तिच्या डोळ्यात एकही आसू
कमी पडू देऊ नको तिला शिक्षणात काही
पुरव तिला पुस्तक, पाटी, सर्वकाही
शिक्षणाबरोबर जोड असू दे संस्कारांची
जोडेल ती माणसे सासरची आणि माहेरची
मुलगी मुलापेक्षा काही कमी नाही
मुलगाच काळजी घेईल याची हल्ली हमी नाही
ज्यांना मुलच नाही त्यांची जरा आठवण कर
देवाने तुला आशीर्वादित केलं म्हणून त्याचं स्तवन कर.


**राज धुदाट** (८४८५८७७२३२)













# इडा पिडा जावों बळीचे राज्य येवों



बळीराजा, सात काळजाच्या आत जपून ठेवावा इतका जिवलग!

जीवघेण्या संघर्षातही त्यांची हृदये स्वच्छ आणि मस्तके ताठ राहिली

बळी वंशातील राजांना सत्ता नको होती, असे नाही. परंतु आपली सत्ता विशिष्ट तत्त्वज्ञानावर, नीतिमूल्यांवर, जीवनदर्शनावर उभी असली पाहिजे, याची पुरेपूर काळजी ते घेत होते. त्यांनी आपल्या हाताने आपल्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा विसर्जित केल्या असत्या आणि आक्रमक आर्य आपल्यापेक्षा वरचढ होत आहेत म्हटल्यावर त्यांच्यापुढे शरणागती पत्करली असती तर त्यांच्या इतक्या पिढ्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते. त्यांनी स्वतःच वैदिकांच्या रंगात रंगून जायचे ठरविले असते, तर आर्यांचे मांडलिक म्हणून ते सुखेनैव जगू शकले असते आणि त्यांनी टाकलेल्या सत्तेच्या छोट्या–मोठ्या तुकड्यांवर पोट भरण्यासाठी लाळ घोटत सुखी राहू शकले असते. परंतु त्यांच्यापैकी कोणीही आत्मद्रोहाचा हा मार्ग पत्करला नाही त्यांच्या सैन्यातील वा प्रजेतील काही व्यक्तींनी वा गटांनी गद्दारी चा मार्ग स्वीकारला हे खरे आहे. परंतु हिरण्याक्षा पासून बाणापर्यंत कोणीही आपल्या जीवनमूल्यांपेक्षा आपल्या प्राणांना अधिक महत्त्व दिले नाही, मग त्यांच्याकडून जीवनमूल्यांपेक्षा सत्तेला अधिक महत्त्व दिले जाण्याची शक्यता फक्रार दूरची झाली. अगदी जीवघेण्या संघर्षातही त्यांची हृदये स्वच्छ आणि मस्तके ताट राहिली. त्यांच्या पद्धतीने जगणे हे तर खरे जगणे आहेच पण त्यांच्या पद्धतीने मरणे हे देखील जीवनाचा झेंडा उंच उंच फडकविण्यासारखे आहे.

हजारो वर्षे ज्याच्या पुनरागमनाची प्रतीक्षा केली जात आहे, असा जिवलग

आणि आमचा लाडका बळीराजा? तो तर तत्वदर्शिनी बुद्धी असलेला बुद्ध. प्रजेतील प्रत्येकाला त्याच्या श्रमाचा योग्य हिस्सा विभागून देणारा संविभागी. स्वतः सर्वांशी समतेने वागणारा आणि प्रजेतील सर्वांना परस्परांशी समतेने वागण्याची प्रेरणा देणारा समतावादी. यज्ञयागाच्या भ्रामक कर्मकांडाऐवजी निर्मितीगर्भ कृषीला जपणारा बळीराजा. वैदिकांची शोषक व्यवस्था नाकरताना एक भावात्मक, सकारात्मक, क्रियाशील समाज रचना घडवून आणणारा हा समाज शिल्पकार. कारस्थानांना आणि कपटांना निर्मळ निरागस मनाने सामोरा जाणारा उन्नत महामानव. काही व्यक्ती व समूह यांचा अपवाद वगळता इतरांनी आपल्या हृदयासनावर प्रेममंत्राने अभिषिक्त केलेला आणि सम्यक राज्यकर्ता असलेला सम्–राज– सम्राट. पराभवातही पराभूत न होणारा शांतचित्त तत्ववेत्ता. हजारो वर्षे ज्याच्या पुनरागमनाची प्रतीक्षा केली जात आहे, असा जिवलग. इतका जिवलग, इतका जिवलग–की, सात काळजांच्या आत कायमचा जपून ठेवावा इतका जिवलग!

( संदर्भ–बळीवंश)























































दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

-:एक शुभेच्छुक :-

तिरोडा


## श्रीमान रायगडा

मनी फुटले रोमांच जेव्हा
तुझ्या चरणी ठेवीला
माथा....
सांग ना रे.... श्रीमान
रायगडा
मला माझ्या शिवरायाची
गाथा....
शिवनेरीची शान तो
राजगडाचा तो मान....
स्वराज्याची राजधानी
करुन
तुझा वाढविला सन्मान....
रायरीच्या कणाकणाने
घातली आर्ततेने साद
की रायरेश्वराने दिली
त्यांना वात्सल्याची
हाक....
का? राजाने धाव घेतली
का? घेतली तुझी आस
इथेच कसा घडविला
राजाने थोर नवा इतिहास
कुठले ते पुण्य रायगडा....
काय रे? तुझे संचित....
कसे बोलविले माझ्या
राजाला
सांग ना रे,ते गुपित....
ते ईश्वर.... तू दुर्गेश्वर
तू थोर.... अन् ते
महान....
तुमची प्रथम भेट वणीतो
अखंड सारा हिंदुस्तान....

**– कविता केशवराव शिंदे (नाशिक) ९९२२९९९६७७**





गोरेगाव तालुक्यातील सर्व जनतेला दिवाळी, भाऊबीज व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !



-: शुभेच्छुक :-


डॉ.विवेक मेंढे

अध्यक्ष

डॉक्टर विभाग गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटी

माजी सरपंच

ग्राम पंचायत तेढा



समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !



-:एक शुभेच्छुक :-

एल.आर.गोंदिया


उजाडली ऊषा
दाही दिशा,
उमलत्या स्वप्नांची,
मनात आशा,
धुंद ही निशा,
मनाची दशा,
हृदयाचा
आसपास,
प्रेमाची नशा,
प्रकाशाची आस,
दिव्याची वात,
ऊमलत्या कळीस,
सुगंधाची साथ.








समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



-: शुभेच्छुक :-

श्री.प्रभू असाटी

माजी सभापती

नगर परिषद तिरोडा






समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

-: शुभेच्छुक :-

लिल्हारे ब्रदर्स














जाहिरात संकलन: सौ. चित्रा कमल कापसे तालुका प्रतिनिधी बेरार टाईम्स, तिरोडा मो.९८२३४८२३७७

adani

# आम्ही करून दाखवतो.

आम्ही लोकांना जोडतो,
निसर्गासोबत मैत्री जपतो.
उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देतो.
कारण आमचं सर्वांवर प्रेम आहे,
म्हणून सगळ्यांची काळजी घेऊन,
त्यांचा आदरही करतो. प्रत्येकाच्या स्वप्नाला
पंख देऊन लाखोंच्या जीवनात आनंदाचा प्रकाश आणतो.
आम्ही हे जाणतो की प्रत्येक व्यक्ती
राष्ट्र उभारणीसाठी मदत करते आणि जेव्हा सगळे
एकत्र येतात तेव्हा काहीही अशक्य नसते.



AdaniOnline | AdaniGroup | AdaniOnline | AdaniOnline | AdaniOnline | www.adani.com